'Research Journey' International Multidisciplinary E- Research Journal
Vol. 1 Issue. 3
ISSN : 2348-7143 (Online)
July-Sept.-2014

# दहशतवाद व मानवी हक्कांचा संबंध

**प्रा. डॉ. शुभांगी डी. राठी**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
श्रीमती पी.के. कोटेचा महिला महाविद्यालय,
भुसावळ, जि. जळगांव (महाराष्ट्र) भारत

**प्रा. ताराचंद एम. सावसाकडे**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
धनाजी नाना महाविद्यालय फैजपूर,
ता.यावल, जि.जळगांव (महाराष्ट्र) भारत

***सारांश :*** *दहशतवाद व मानवाधिकार या दोन संकल्पना परस्पर विरोधी आहेत. मानवाच्या विकासासाठी मानवाधिकार सकारात्मक आहे. तर दहशतवाद मानवी विकासाच्या आड येत असून नकारात्मक आहे. २१ व्या शतकात या दोन्ही संकल्पनांची व्याप्ती वाढलेली आहे. दहशतवादी कारवायांनी संपुर्ण जगाला भयभीत व त्रस्त करुन सोडले आहे. सामान्य माणसापासून अमेरिकेसारख्या महाशक्तीशाली राष्ट्राला सुद्धा दहशतवाद्यांनी त्रस्त करुन सोडले आहे. विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रगतीमुळे दहशतवाद्यांची विध्वंसक्ता वाढली असून मानवी हक्कांचे उल्लंघन मोठ्या प्रमाणावर घडत आहे. त्यामूळे दहशतवाद हे मानवाधिकारावरील एक वैश्वीक संकट बनले आहे.*

## प्रस्तावना :

आज जगापुढे मोठे संकट आहे ते म्हणजे दहशतवाद व मानवाधिकार. दहशतवादामुळे अनेक राष्ट्रांची वित्त व जीवितहानी झाली आहे. दहशतवादाला बळी पडलेल्या राष्ट्रांमध्ये भारत, रशिया, चीन, अमेरिका, ब्रिटन, स्पेन या राष्ट्रांचा उल्लेख करता येतो. या दोन्ही समस्या केवळ गरीब व अविकसित किंवा विकसनशिल राष्ट्रांपुरती मर्यादीत न राहता अमेरिकेसारख्या विकसित राष्ट्रापुढे तिने अनेक आव्हाने निर्माण केली आहेत. दहशतवादामध्ये हिंसाचाराचा जाणीवपूर्वक वापर केला जातो. हिंसेतून दहशत निर्माण करणे आणि आपले उद्दिष्ट्ये साध्य करणे हा त्यामागील हेतू असतो. आपल्या मागण्यांकडे सर्वाचे लक्ष वेधून घेणे व शासनाला कृती करण्यास भाग पाडणे. यासाठी मोठ्या प्रमाणात मानवाधिकारांची पायमल्ली होत असते. मानवाधिकारांमध्ये माणसाला आपले जीवन जगण्याचा अधिकार देण्यात आलेला आहे. दहशतवादी अनेक लोकांना मृत्युमुखी पाडत असल्यामुळे मानवाधिकाराचे उल्लंघन होत आहे.

## उद्देश (Objective) :

१. दहशतवाद व मानवी हक्क या संकल्पनेचा शोध घेणे.
२. दहशतवाद व मानवी हक्कांच्या संबंधाचा शोध घेणे.

## गृहितक (Hypothesis):

दहशतवादी हल्ल्यांमुळे मानवी हक्कांवर परिणाम होतो.

**अभ्यास पद्धती (Method) :**

प्रस्तुत शोध निबंध तयार करतांना संदर्भ पुस्तके, मासिके, वृत्तपत्रे व इंटरनेट वरील माहिती गोळा करून प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा वापर करून व ऐतिहासिक पद्धतीचा उपयोग करून प्रस्तुत विषयाचे विश्लेषण केलेले आहे.

**दहशतवाद :**

दहशतवाद या संकल्पनेबाबत जागतिक स्तरावर वितंडवाद घातला जात आहे. अभ्यासक व विद्वान मंडळी यांचे दहशतवादाच्या व्याख्या बाबत एक मत होत नाही. दहशतवादाच्या २४६ व्याख्या करण्यात आल्या आहे. आजपर्यंत कुठेही दहशतवादाची सर्व समावेशक व्याख्या तयार झालेली नाही. जॉन क्रेंटम यांनी अशी व्याख्या केली आहे. "राजकीय उद्दिष्टे साध्य करण्याकरिता समाजाच्या किंवा त्यातील विशिष्ट स्तरात भिती व दहशत निर्माण करण्याच्या उद्देशानेच केलेली हिंसात्मक गुन्हेगारी वर्तन म्हणजे दहशतवाद होय."[१]

१९८४ साली अमेरिकन कायदे मंडळाने एक कायदा संमत करून दहशतवादाची व्याख्या करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

"Terrorism is the threat or use of violence for political purpose by individual groups, whether acting for or in opposition to established government authority, when such actions are intended to shock stun or intimidate targed group wider than immediate victims."

अर्थ - राजकीय उद्दिष्ट्ये साध्य करण्याकरीता काही व्यक्तिगत गटांनी, प्रस्थापित शासकीय अधिकाऱ्यांच्या बाजूने अगर विरूद्ध कारवाई करतांना दहशतीचा अगर हिंसाचाराचा केलेला वापर म्हणजेच दहशतवाद होय. त्यावेळी अशी कारवाईचे शिकार बनलेल्या जवळच्या व्यक्तीऐवजी अन्य गटाला धक्का देण्याकरीता किंवा त्यांची शुद्ध हरपण्याच्या उद्देशाने केलेली असते. बोआ गँगर यांनी राजकीय उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी नागरी लक्ष्ये अथवा सामान्य नागरीक यांच्याविरूद्ध हिंसेचा किंवा प्रत्यक्ष वापर किंवा तशी धमकी देणे असा दहशतवादाचा अर्थ सांगितला आहे.[२]

वरील व्याख्यांवरून दहशतवादाची पुढील वैशिष्ट्ये दिसून येतात.

१. दहशतवादी हिंसक कारवाई करण्यासाठी संघटित झालेले असतात.
२. ते योजनाबद्ध पद्धतीने हिंसाचार घडवून आणतात.
३. विशिष्ट लोकांचा आधार घेऊन आधुनिक शस्त्राच्या सहाय्याने समाजात हिंसा घडवून आणतात.

४. हिंसाचार घडवून लोकांच्या मनात, समाजात, देशात भितीचे वातावरण निर्माण करतात.

५. आपल्या मागण्या मान्य करून घेण्यासाठी सरकारला अडचणीत आणतात व सरकारला वेठीस धरतात.

६. दहशतवादाला कोणता एक धर्म नसतो. तो मानवतेच्या विरोधात कृत्य करीत असतो.

७. सार्वजनिक व समाजाच्या मालमत्तेची नासधुस करीत असतो.[३]

अनेक निरपराध लोक, स्त्री, मुले, पुरूष यांची हत्या करणे, मोठ्या व्यक्तीचे अपहरण करणे, एखाद्या सार्वजनिक ठिकाणी बॉम्बस्फोट घडवून आणणे, गोळीबार करणे, अफवा पसरविणे अशा प्रकारचे कृत्ये यांच्याकडून केली जातात. दहशतवादाचे धार्मिक मुलतत्त्वादी दहशतवाद, राज्य पुरस्कृत दहशतवाद, राष्ट्रांतर्गत दहशतवाद, सिमापार दहशतवाद, राज्य दहशतवाद, डाव्या व उजव्या विचारसरणीचे दहशतवादी, वांशिक राष्ट्रीय व फुटीरतावादी दहशतवाद असे प्रकार दिसून येतात.

**दहशतवादाची पार्श्वभूमी :**

२० व्या शतकाच्या उत्तरार्धात व २१ व्या शतकाच्या प्रारंभापासून दहशतवादाने उग्ररूप धारण केले आहे. प्राचीन काळापासून दहशतवादाचे रूप कोणत्या न कोणत्या स्वरूपात नागरिकांच्या मानगुटीवर बसले होते याची साक्ष इतिहास देतो. इजिप्तशियन व ॲसीरीयन संस्कृती दहशवादाची बिजे दिसून येतात. ख्रिस्तपूर्व १००० मध्ये स्पार्ट या राज्याची निर्मिती झाली. एक कठोर शिस्तीची राजवट म्हणून स्पार्टची ख्याती होती. रोमन साम्राज्यात गुलामांना अत्यंत क्रुरपणे वागविण्यात येत असे. त्यासोबतच दुरवरच्या प्रांतातील प्रजेला दहशतवादी अत्यांचारांना तोंड द्यावे लागले. मध्ययुगात नादीरशहा व तैमुरलंग हे एक प्रकारचे दहशतवादी राज्यकर्ते होते. भारतातील वेडा महमंद याने आपली राजधानी अचानकपणे बदलविण्याचे काढलेले आदेश त्यामुळे प्रजेला अत्यंत हाल-अपेष्ठा सहन कराव्या लागल्या. फ्रान्सचा चौदावा लुई याचीही राजवट दहशतवादी प्रकारात मोडले. इ.स. १७९३ ते १७९५ या कालखंडात फ्रेंच मध्ये दहशतीचे प्राबल्य होते. सतराव्या शतकात युरोपात लोकशाही व उदारमतवादी विचारसरणीचे वारे वाहू लागल्यानंतर नेपोलियनच्या साम्राज्याला कडवा विरोध होत होता. त्या संघर्षात युरोपात बराच हिंसाचार व गोंधळ निर्माण झाला होता. १९ व्या शतकाच्या उत्तरार्ध खंडात व २० व्या शतकाच्या पूर्वार्धात साम्यवाद, अराजकतावाद, नाझीवाद आणि फॅसिस्ट विचारसरणीतून राजकीय दहशतवादाला खतपाणी मिळाले.[४] पहिल्या व दुसऱ्या महायुद्धानंतर जगाची वाटचाल सोव्हिएट रशिया व अमेरिका यांच्या वर्चस्वाखाली अनेक देशामध्ये दहशत निर्माण झाली. शित युद्धाच्या कालखंडात या दोन महासत्तांची दहशत निर्माण झाली. खऱ्या अर्थाने आंतरराष्ट्रीय दहशतवादाचा प्रारंभ १९६० नंतर वेगाने झाले. 'लैला खालदे' या पॅलेस्टीन स्त्रीने प्रथम लंडनला जाणाऱ्या विमानाचे अपहरण करून सर्व जगाला आश्चर्याने थक्क करून सोडले.

त्यानंतर अमेरिकेतील वर्ल्ड ट्रेड सेंटर वरील ११ सप्टेंबर २०११ रोजी आतंकवाद्यांनी संपूर्ण जगाला दाखवून दिले.[५] भारताच्या आर्थिक राजधानी मुंबईवरील २६/११/२००८ रोजी अजमल कसाब व त्याच्या साथीदारांनी केलेले कृत्य व त्यात नाहक बळी ठरलेल्या असंख्य स्त्री पुरूषांच्या मानवी हक्कांचे उल्लंघन झाले.

**मानवी हक्क :**

मानवी हक्क म्हणजे मानव म्हणून निसर्गाने जे अधिकार दिलेली असतात त्याला मानवी हक्क असे म्हणतात. मनुष्याची प्रतिष्ठा, स्त्री पुरूषांची समानता आणि सामाजिक संदर्भात त्यांचे स्वातंत्र्य या सर्वांचा मानवी अधिकारात समावेश होतो. न्याय आणि समता या मूल्यांना प्रमाण मानून मनुष्याला काही मुलभूत अधिकार असले पाहिजे, हा उद्दात्त विचार मानवी अधिकारात येतो. ग्रीक तत्वज्ञान सेंट थॉमस यांनी "मानवाला स्वतःचे जीवन सुकर व्हावे. या दृष्टीने जे मुलभूत अधिकार दिले असतात त्याला मानवी हक्क म्हणतात" [६] अशी व्याख्या केलेली आहे. मानवी हक्क हे नैसर्गिक न्यायतत्वांतून निर्माण झालेले आहेत. हे हक्क कोणत्या देशाच्या जोर जबरदस्तीने किंवा कायद्याच्या चौकटीतून व सामाजिक ऐक्यातून निर्माण झालेले नाही. तर ते प्रत्येक मनुष्याच्या जन्मासोबतच आलेले आहेत असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. प्रा. हॅराल्ड लॉस्की या जगविख्यात विचारवंताने असे म्हटले आहे की "ज्या हक्काशिवाय व्यक्तीला आपल्या व्यक्तीमत्त्वाचा सर्वांगीण विकास करता येणे अशक्य आहे ते मानवी हक्क होय." [७] व्यक्तीला प्रदान केलेले अधिकार कुणीही हिरावून घेऊ शकत नाही. यात जीवीताचा, समानतेचा, विचार, विवेक, धर्मस्वातंत्र्य, शिक्षण, राष्ट्रीयता, शोषणमुक्त राहण्याचा, मतदानाचा, सामाजिक राजकीय कार्यात सहभागी होण्याचा अधिकार, कुटूंबाच्या संरक्षणाचा, भितीमुक्त जीवन जगण्याच्या हक्कांचा समावेश आहे. मानवी हक्कांचा उदय आपणास इंग्लंडच्या १२१५ मधील मॅग्नाचार्टा १६१८ चा पिटीशन ऑफ राईट (Pettition of Right), १६७६ Habus Corpas Act, १६८८ चा Bill of Right, १७७६ मध्ये अमेरिका संविधानाने केलेली मुलभूत अधिकारांची घोषणा, १७८९ मधील फ्रान्स राज्यक्रांतीतील उदयास आलेल्या स्वातंत्र्य, समता, बंधुता या सर्वांच्या परिणामातून व १८१५ सारख्या व्हीयन्ना परिषदेतील गुलामगिरी विरोधी ठराव, जिनेव्हा आणि हेग परिषदांमधील मानवी प्रतिष्ठांशी विसंगत अशा प्रथांचे निर्मुलन करण्या संबंधीचे ठराव [८] व १९४५ मध्ये जपानच्या हिरोशीमा व नागासाकी या दोन शहरात अणु बॉम्ब टाकून २ लाखांपेक्षा जास्त लोकांची व मालमत्तेची हानी करण्यात आली.

या आधी जगात कुठेही अशा प्रकारची मानवी व वित्तहानी झाली नव्हती. यापुढे अशा प्रकारची मानवी व वित्तहानी होईल तर माणूस या पृथ्वीवर औषधापुरताही शिल्लक राहणार नाही. म्हणून आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता टिकविण्यासाठी आणि आंतरराष्ट्रीय सहकार्यातून आर्थिक आणि सामाजिक विकास व मानव

अधिकारांचे रक्षण करण्याच्या उद्दिष्टांतून २४ आक्टोंबर १९४५ रोजी संयुक्त राष्ट्रांची निर्मिती झाल्यानंतर जानेवारी १९४७ च्या दरम्यान मानवी हक्कांवरील आंतरराष्ट्रीय कायद्याचा मसुदा तयार करण्यासाठी मानवी हक्क आयोगाची सभा १० डिसेंबर १९४८ रोजी होऊन संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने ३० कलमी मानवी हक्कांची सनद मंजुर केली.[१] संयुक्त राष्ट्रांच्या सभासद राष्ट्रांना मानवी हक्कांची संरक्षण करण्याची जबाबदारी स्विकारावी लागली.

**दहशतवाद व मानवाधिकार :**

दहशतवाद व मानवी हक्क यांचा अन्वयार्थ विचारात घेतल्यास दहशतवाद आणि मानवी हक्क या दोन्ही बाबी एकमेकांच्या परस्परविरूद्ध आणि भिन्न आहेत हे सिद्ध होते. दहशतवाद ही विध्वसंक अमानवी तर मानवी हक्क ही विधायक व मानवी अशी आहे. एक मानवाला मानवापासून, मानवाच्या माणुसकीपासून तोडते, तर दुसरी मानवाला मानवाशी, मानवाच्या माणुसकीशी जोडते, जवळ आणते. पहिल्यात अविचार आहे तर दुसऱ्यात विचार आहे. पहिल्यात पशुत्व तर दुसऱ्यात मनुष्यत्व आहे. पहिली विघटनात्मक, बेकायदेशिर व अनैसर्गिक तर दुसरी घटनात्मक, कायदेशीर व नैसर्गिक म्हणता येईल. एकात अनिती तर दुसऱ्यात निती आहे. दहशतवाद हे दुधारी शस्त्र आहे तर मानवी हक्क ही मानवी आचरणाचे उपयुक्त शास्त्र आहे. एक जगाने नाकारलेली बाब असून दुसरी जगाने स्वीकारलेली बाब आहे. एक वाईट चिंतते तर दुसरी चांगली चिंतते, एक सुखातून दुःखाकडे जाणारा मार्ग तर दुसरा सुखातूनदुःखाकडे जाणारा मार्ग आहे. एक नैतिक मूल्यांचा ऱ्हास करते तर दुसरा नैतिक मूल्यांची वृद्धी करते. एक मानवी जीवनाचे सामाजिक, राजकीय व आर्थिक अधःपतन करते तर दुसरी मानवी जीवन उंचावते, वृद्धीगत करते. एक जीवन हिरावून घेते तर दुसरी जीवनाचे रक्षण करते. एकाचे दहशत, बळजबरी, दडपशाही, शोषण, अत्याचार इत्यादी अपत्य तर दुसऱ्याचे प्रेम, सामंजस्य, स्वातंत्र्य, समता, बंधुता इत्यादी अपत्य ठरतात. दहशतवाद आणि मानवी हक्क या दोघांची वैशिष्ट्ये, उद्दिष्ट्ये यामध्ये केवळ विरोध नव्हे तर व्याघाती संबंध आहे.

जगाच्या कानाकोपऱ्यात कोणत्या ना कोणत्या दहशतवादी संघटनांचे अस्तित्व आढळते. त्यामुळे मानवी हक्क संरक्षणाची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. दहशतवादाचे स्वरूप जस-जसे बदलत गेले तसे त्यांचे लक्षही बदलेले आहे. त्यामुळेच मानवाधिकार हननाची व्याप्ती प्रचंड प्रमाणात वाढली आहे. दहशतवाद्यांकडून वापरली जाणारी शस्त्रास्त्रे अत्याधुनिक असल्यामुळे आता दहशतवादी गटांना व्यापक जनसंहार करणे शक्य झाले आहे. राज्यघटना मग ती कोणत्याही देशाची असो तीने दिलेले मुलभूत अधिकार व मानवी हक्कांच्या उपभोगासाठी लोकशाहीशासन, कायदा व सुव्यवस्थेची स्थिती निःपक्ष न्यायालये आणि निर्भयता यांची

आवश्यकता असते. परंतू दहशतवादी या सर्वांवर आघात करून ते नाकारतात. सभ्य समाजाला मानवाधिकारापासून वंचित व्हावे लागते. दहशतवादाला लोकशाही पद्धती मान्य नसल्यामुळे त्यांच्याकडून लोकशाही मूल्ये रूजवणूकीसाठी व लोकशाही बळकटीसाठी आवश्यक असलेल्या निवडणुकाही निर्णायक आणि शांततेच्या वातावरणात पार पाडण्यात अडथळे निर्माण केले जातात. त्यामुळे शांततामय मार्गाने सभा घेणे, देशाच्या सरकारात प्रत्यक्ष अथवा प्रतिनिधी मार्फत सहभागी होण्याचा हक्क हिरावला जातो. दहशतवादामुळे धर्म व संस्कृती पालनाच्या अधिकारावर आक्रमण केले जाते. दहशतवादी गट धार्मिक स्थळांचा वापर आश्रयस्थान म्हणून तर कधी लक्ष म्हणून करतात. तसेच धार्मिक कट्टरवादाच्या आग्रहामुळे तर धर्म चिकित्सा करू इच्छितात त्यांचे स्वातंत्र्य नाकारले जातात व त्यांचा अनन्वीत छळ केला जातो.

२१ व्या शतकात दहशतवादाने लक्षावधी लोकांचा बळी घेतला असून शत्रूवर नियंत्रण मिळविण्यासाठी केलेल्या कृत्यामुळे नागरिकांचे संविधानिक मानवी हक्क नाकारले जातात. दहशतवादी घटनेनंतर सैनिक हस्तक्षेपाला वाव मिळून त्या भागातील नागरिकांचे स्वातंत्र्य संकुचित केले जाते. अरब इस्त्राईल संघर्षात अरबांना पॅलेस्टाईन द्यायचा नाही या इस्त्राईलच्या भूमिकेमुळे आणि इस्त्राईलचे अस्तित्व संपविल्याशिवाय स्वस्थ बसायचे नाही. त्यामुळे तेथील हजारो अरब आणि ज्यु निशस्त्र आणि निष्पाप लोक बळी गेले. वेळोवेळी दहशतवाद्यांनी विमानाचे केलेले अपहरण, रेल्वेत घडवून आणलेले बॉम्बस्फोट आणि पर्यटन स्थळांना लक्ष केल्यामुळे लोकांचा संचार विश्रांती आणि विरंगुळ्याचा हक्क धोक्यात येत असतो.

RESEARCH JOURNEY

**निष्कर्ष :**

मानवी हक्क व दहशतवाद या दोन्ही संकल्पना वेगळ्या स्वरूपांच्या असल्यामुळे एक व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी झटनारी आहे. तर दुसरी मानवाचे जीवन नेस्तनाबूत करणारी आहे असे दिसून येते. मानवी हक्कांचा विचार हा मानवतावादी दिसून येतो तर दहशतवाद हा मानवी संस्कृतीमध्ये अराजकता निर्माण करणारा त्यामुळे २१ व्या शतकात दहशतवादाचे आव्हान संपूर्ण जगाला चांगलेच जाणवत आहे.

**संदर्भ :**

१. प्रा.म.न.उद्गावकर, २१ व्या शतकातील दहशतवाद, डायमंड पब्लिकेशन पुणे, २००९, पृ.१०
२. कित्ता, पृ. १०
३. National Seminar on Terrorism and Human Right, Organised by Dayanand College, Latur, १९, २० December २००९, Page ३२
४. प्रा.म.न.उद्गावकर, २१ व्या शतकातील दहशतवाद, डायमंड पब्लिकेशन पुणे, २००९, पृ.२

५. कित्ता, पृ. ९८

६. ॲड. अरूण देशमुख, मानवी हक्क आयोग, डिसेंबर २०१०, पृ. २१

७. राजलोटे, राजकीय सिद्धांत, पिंपळापुरे आणि कंपनी पब्लिशर्स नागपूर, पृ. ११३

८. राधेशाम चौरसिया, संयुक्त राष्ट्रसंघ, ॲटलांटीक पब्लिकेशन दिल्ली, २००२, पृ. ४१६

९. Human Universal Declaration of Human Right.

१०. मासिके व वर्तमानपत्रे